महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्ष
८ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१.
दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९ वेबसाईट : http://www.mahacet.org ई-मेल:cetcell@mahacet.org

क्र.तंशिप्र-1226/प्र.क्र.07/ जाहीर सूचना/कॅप्रप/2026/1651 दिनांक-10.07.2026

# जाहीर सूचना

***शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया (CAP) अंतर्गत जेईई (JEE Main) परीक्षेतील गुण प्राप्त (Fetch) करण्याबाबत***

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया (CAP) ची ऑनलाईन नोंदणी दिनांक **०२ जुलै २०२६** पासून सुरू असून, नोंदणी प्रक्रियेस दिनांक **१६ जुलै २०२६** पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सदर प्रवेश प्रक्रियेसाठी एमएचटी-सीईटी (MHT-CET) तसेच जेईई (JEE Main) परीक्षेतील गुण (percentile) ग्राह्य धरले जातात.

एनटीए, नवी दिल्ली यांच्या निर्देशानुसार, केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या ऑनलाईन अर्जामध्ये उमेदवारांचे जेईई (JEE Main) परीक्षेतील गुण डिजीलॉकर (DigiLocker) द्वारे थेट प्राप्त (Fetch) करण्यात येत आहेत.

काही उमेदवारांच्या जेईई (JEE Main) गुणपत्रकावरील नाव व डिजीलॉकरमधील नावामध्ये तफावत असल्यामुळे जेईई (JEE Main) परीक्षेतील गुण (percentile) प्राप्त (Fetch) करताना तांत्रिक अडचणी निर्माण होत असल्याची बाब निदर्शनास आली होती. या अनुषंगाने एनटीए, नवी दिल्ली यांच्याशी समन्वय साधून सदर तांत्रिक अडचणींचे निराकरण करण्यात आले आहे.

त्यामुळे, ज्या उमेदवारांना यापूर्वी जेईई (JEE Main) परीक्षेतील गुण प्राप्त (Fetch) करताना अडचणी येत होत्या, त्यांनी आपल्या **CAP Portal** वरील लॉगिनमध्ये जाऊन जेईई (JEE Main) परीक्षेतील गुण (percentile) प्राप्त (Fetch) करून अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण करावी.

ज्या उमेदवारांनी जेईई (JEE Main) परीक्षेतील गुण CAP अर्जामध्ये समाविष्ट न करता अर्जाची निश्चिती प्रक्रिया पूर्ण केलेली आहे, ते उमेदवारदेखील आपला अर्ज Unlock करून जेईई (JEE Main) परीक्षेतील गुण प्राप्त (Fetch) करून अर्जामध्ये आवश्यक ती दुरुस्ती करू शकतील. ई-स्क्रुटिनी (E-Scrutiny) द्वारे अर्जाची निश्चिती केलेल्या उमेदवारांनी अर्ज Unlock करण्यासाठी Grievance नोंदवावा. तसेच, प्रत्यक्ष स्क्रुटिनी (Physical Scrutiny) द्वारे अर्जाची निश्चिती केलेल्या उमेदवारांनी अर्ज Unlock करण्यासाठी संबंधित Scrutiny Center (FC/SC) येथे प्रत्यक्ष भेट द्यावी.

सर्व संबंधित उमेदवारांनी विहित मुदतीत अर्ज भरण्याची/दुरुस्तीची प्रक्रिया पूर्ण करावी. विहित मुदतीत अर्ज प्रक्रिया पूर्ण न करणाऱ्या उमेदवारांचा समावेश गुणवत्ता यादीमध्ये करण्यात येणार नाही, याची सर्व संबंधित उमेदवारांनी नोंद घ्यावी.

सही/-

**आयुक्त**
**महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा**
**(सीईटी) कक्ष, मुंबई**